“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।।सर्वे सत्यं प्रतिष्ठितम्।।


मूल्य रु. ५

क्रमांक २ वर्ष : ३५ जुलै-सप्टेंबर २०१३

BOOK PACKET (PERIODICAL)

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


TO,


From : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


## ठाणे मंच : १७ वा वर्धापनदिन सोहळा

### हार्दिक निमंत्रण

कार्यक्रम : सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचे खुसखुशीत व मनोरंजनात्मक विवेचन

विषय : ‘रंग भावनांचे’ (खास प्रौढांसाठी)

कार्यस्थळ : सहयोग मंदीर, सहयोग मंदीर रोड, ठाणे

दिनांक : बुधवार १६ ऑक्टोबर २०१३ (बकरी ईद)

वेळ : संध्याकाळी ५ ते ७

सर्व ज्ञातिबांधवांना विनंती आहे की त्यांनी हेच निमंत्रण समजून सहकुटुंब कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहावे.

मंजिरी कुलकर्णी (२५३३३२९६) चित्रा कामत (२५३७५९७१)

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०१३ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांस उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.

## संपादकीय

**ठाणे मंचच्या आगामी कार्यक्रमाचे व्याख्याते**
**मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी**

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) २१ वे शतक हे निराशेचे शतक म्हणून नमूद केलेले आहे. तर या निराशेवर, मानसिक ताणतणावावर मात करण्यासाठी आपल्या भावनांचे नियोजन कसे करावे हे हे विषद करण्यासाठी ठाण्याचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी हे **'रंग भावनांचे'** या विषयावर व्याख्यान देणार आहेत. ठाण्याच्या IPH (Institute of Psychological Health) या नावाजलेल्या संस्थेचे ते संस्थापक आहेत. या लोकोपयोगी संस्थेचे ब्रीदवाक्य आहे 'सुदृढ मन सर्वांसाठी' डॉ. नाडकर्णी म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व. शिवाय ते एक उत्कृष्ट वक्ते आहेत. मराठी, हिन्दी, इंग्लिश या तीनही भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे. मन, मनाशी निगडीत अशा सर्व विषयांवर वैचारिक पण मनोरंजनात्मकरीत्या विवेचन करण्यात तर त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या दांडग्या अनुभवाचा लाभ ज्ञातिबांधवांसाठी व्हावा म्हणून ठाणे मंचतर्फे १६ ऑक्टोबर रोजी एक व्याख्यान ठेवलेले आहे त्याचे निमंत्रण समोरील पृष्ठावर दिलेले आहे. तर सर्व ज्ञातिबांधवांनी आपल्या मित्रमंडळीसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या व्याख्यानाच्या संधीचा अवश्य लाभ घ्यावा.

१ जुलै २०१३

**सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे**
(अतिथी संपादक)

## हळदीकुंकू समारंभ : भगिनींस आमंत्रण

नेहमीचा श्रावणातला हळदीकुंकू समारंभ यंदा जोगेश्वरी व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

| | जोगेश्वरी | ठाणे |
|---|---|---|
| **तारीख** | : शुक्रवार ३० ऑगस्ट | शुक्रवार ३० ऑगस्ट |
| **स्थळ** | : रामेश्वर मंदीर<br>सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू) | सौ. शुभदा कुलकर्णी यांच्या निवासस्थानी<br>ई-१ नटराज सोसायटी, पाच पाखाडी, ठाणे |
| **वेळ** | : संध्याकाळी ५ ते ७<br>**संघ कार्यकारिणी तर्फे**<br>सौ. जयश्री भेडसगांवकर<br>सौ. शांता पालेकर | संध्याकाळी ५ ते ७<br>**ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे**<br>सौ. शुभदा कुलकर्णी (९३२३५५१२०१)<br>श्रीमती मंजिरी कुलकर्णी (२५३३३२९६) |



## एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांस बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील हुशार विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही २४ नोव्हेंबर २०१३ रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे :

| परीक्षा | किमान पात्रता |
|---|---|
| दहावी | ८०% |
| बारावी – विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| वाणिज्य | ७०% |
| कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | ६०% |
| एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी<br>एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौटस, कंपनी सेक्रेटरी,<br>पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी, | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

### अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑक्टोबर २०१३

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर व संपूर्ण पत्ता. The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.

## प्रकाशझोत

### 'श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा - श्रीमहालक्ष्मी समग्र माहिती' पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे स्वामीजींतर्फे प्रकाशन

आपण सर्व आपापल्या कुलदैवतांवर निस्सीम श्रद्धा बाळगणारे व त्यांची मनोभावे उपासना करणारे सारस्वत आहोत. आपण नेमके कोण, कुठून आलो, आपल्या मठाची व देवस्थानांची स्थापना कधी झाली त्यांतील रूढी व परंपरा काय आहेत, पूजा अर्चा कशा होतात याबद्दल अनेकांना जिज्ञासा असते. श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा व श्रीमहालक्ष्मी या कुलदैवतांची व त्यांच्या देवालयांची माहिती संकलित करून पुस्तक रूपाने उपलब्ध असावी या भावनेने श्री. सुरेश पुणेकर यांनी हे पुस्तक लिहिलेले आहे. पहिल्या आवृत्तीत श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा, श्रीमहालक्ष्मी, मंदिरातील दैनंदिन पूजा व मठ परंपरा अशी प्रकरणे होती. पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन २००९ साली झाले होते. दुसऱ्या आवृत्तीत पहिल्या आवृत्तीतील तपशीलांत सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्याशिवाय श्रीमहालसा, श्रीकामाक्षी व श्रीआर्यादुर्गा या पालवी देवतांची माहिती समाविष्ट करण्यात आलेली आहे. या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ शु. पंचमी रोजी म्हणजे १३ जून रोजी वाळकेश्वर येथील कवळे मठांत प.पू. श्रीमत् शिवानंद सरस्वती स्वामीजी यांच्या हस्ते प्रतिष्ठित शिष्यवर्गाच्या उपस्थितीत करण्यात आले. अत्यंत उपयुक्त माहिती असलेले हे पुस्तक प्रत्येक ज्ञातिबांधवाच्या संग्रहांत ठेवण्यासारखे आहे.

(पृ. संख्या ३५० + अनेक आकर्षक फोटो, मूल्य रु. १८०, उपलब्ध : कवळें व वाळकेश्वर मठ, श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा देवस्थाने, सीतलादेवी टेम्पल - माहीम)

### 'मेरा भारत महान' गांधीवादी श्री. वसंत दिवेकर यांचे पुस्तक प्रकाशित

गेल्या पिढीमध्ये कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्टस या उच्च पदावरून निवृत्त झालेले कै. वाय.आर. दिवेकर हे सर्वांच्या परिचयाचे होते. समानतेचे निस्सीम उपासक, जन्मजात खिलाडु वृत्ती, निसर्गवेडे, कोणतेही काम गौण न मानणारे, कुशाग्र बुद्धीचे अशी त्यांची ख्याती होती. त्यांचाच वारसा त्यांचे ज्येष्ठ सुपुत्र पुण्याचे श्री. वसंत दिवेकर यांनी पुढे चालविलेला आहे. ते सध्या नव्वदीच्या घरात आहेत. कर्करोगातून त्यांची तात्पुरती सुटका झाली तरी व्हील चेअर सोबतीला घेऊन ते सर्व व्यवहार करत असतात. त्यांचा दुर्दम्य उत्साह व सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद आहे. व्यवसायाने ते केमीकल इंजिनियर होते व केम्टेक्स केमिकल्स या नामांकित अमेरिकन कंपनीचे अध्यक्ष होते पण चंगळवादा पासून दूर राहिले. उलट ते म. गांधीचे सच्चे अनुयायी आहेत. भारत हा शहरात नसून ग्रामीण भागांत आहे हे म. गांधीचे तत्त्व त्यांना मनोमनी पटलेले आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण भागांत गांवतलाव निर्मिती



चळवळ उभारून दुष्काळी भागातील अनेक गावांत पाण्यांचे दुर्भिक्ष्य दूर करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. तरुणांमध्ये संशोधन व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्याबाबत प्रबोधन करणारे विचारवंत, अनेक स्वयंसेवी संस्थांचे, इस्पितळांचे व विविध सामाजिक प्रकल्पांचे आधारस्तंभ, बालकांमध्ये मूल्यशिक्षण रुजविण्यासाठी प्रयत्नवादी, रयत शिक्षण संस्थांचे सल्लागार, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सक्रिय कार्यकर्ते असे त्यांच्या विविध विधायक कार्यांची अनेक अंगे होत. आपल्या संघाला व एज्युकेशन सोसायटीला त्यांनी स्वत: व बंधुसह कैकप्रसंगी भरघोस देणग्या दिलेल्या आहेत.

अलिकडेच श्री. दिवेकर यांनी 'मेरा भारत महान' हे पुस्तक प्रसिद्ध केलेले आहे. हे पुस्तक म्हणजे लेखमालाच आहे. त्यात आपला न्यूनगंड व तो घालवायची जरूरी, भारताचे गतवैभव, भारतातील त्रुटी व विकृती, परिवर्तनाकरिता सुचविलेला मार्ग, श्रीमंतांची सुस्थिती व गरीबांची दैन्यावस्था हे मुद्दे सहज सुलभ भाषेत सविस्तर मांडलेले आहेत. समस्यांचे विवरण करून प्रतिकारार्थ उपायही सुचविलेले आहेत.

('मेरा भारत महान', पृष्ठ संख्या २०० + आकर्षक फोटो, मूल्य : रु. २२५, प्रकाशक : यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे ०२०-३०२५३११७)

### 'कवडसे' व 'आभास' श्री. दुर्गानंद गायतोंडे यांची आणखी दोन पुस्तके प्रकाशित

मुखपत्रिकेच्या गेल्या काही अंकांत पुण्याचे श्री. दुर्गानंद गायतोंडे यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांची वेळोवेळी परीक्षणे आलेली आहेत. त्यांचे वय सध्या ९४ एवढे आहे. ते इतर सामाजिक कार्याशिवाय लेखनांतही मग्न असतात. श्री. गायतोंडे यांची अलिकडेच आणखी दोन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

'कवडसे' या पुस्तकांत त्यांना भावलेल्या सामान्यांतील असामान्य व्यक्तींची सुरेख शब्दचित्रे रेखाटलेली आहे. सुप्रीम कोर्टाचे निवृत्त सरन्यायाधीश यशवंत चंद्रचूड, सुप्रसिद्ध गायक कुमार गंधर्व यांच्या प्रथम पत्नी भानुमती कोमकली, असंख्य लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या पूज्य माताजी निर्मलादेवी, कम्युनिस्ट पार्टीचे कार्यवाह ए.बी. बर्धन, सायमन कार्व्हस कंपनीच्या दुर्गापूर स्टील प्रकल्पाचे सर्वेसर्वा एच.प्रॅट अशा निरनिराळ्या क्षेत्रातील नऊ व्यक्तींवर हे लेख आहेत. या लेखांवरून गायतोंडे यांचा दांडगा जनसंपर्क व गुणग्राहकता लक्षात येते.

'आभास' हा एक लघुकथांचा संग्रह आहे. यांत एकंदर दहा कथा आहेत. त्यातील दोन कथा सत्य घटनांवर आधारित आहेत. त्यांतील 'धर्म' ही कथा स्वानुभवावर आधारित आहे. १९४६-४७ च्या दरम्यान फाळणीच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी जातीय दंगे होत असत. त्यावेळी श्री. गायतोंडे दिल्लीत

असतांना एकदा आपल्या गरोदर पत्नीसह बापूजींच्या प्रार्थनेला गेले होते. प्रार्थना संपेपर्यंत सुर्यास्त झाला होता. त्यांचे निवासस्थान कित्येक मैलांवर होते व त्यांना मुसलमान वस्तीतून पुढे जाणे भाग होते. मध्येच ते एका हिंस्त्र दिसणाऱ्या घोळक्यात सापडले. पण त्या घोळक्यांतील एक धटिंगण दिसणारा पुरुष पुढे आला व त्यांने गायतोंडे दांपत्याना टांग्यात सोबत करून सुखरुप घरी पोहचविले. घरी पोचल्यावर त्यांनी त्या धटिंगणाचे आभार मानले व त्याचे नांव विचारले. तो उत्तरला 'महंमद इक्बाल, खुदा हफीज', बापूजींनी आपल्या प्रार्थनेत सांगितलेल्या 'धर्म' या व्याख्येवर हा ज्वलंत कळस होता. मानवधर्म हाच श्रेष्ठ धर्म हा या कथेचा गाभा. 'आभास' या पुस्तकातल्या सर्वच कथा जिवंत वाटतात व त्यांतील ओघवत्या शैलीमुळे एक कथा संपूर्ण वाचून होईपर्यंत पुस्तक खाली ठेवता येत नाही.

('कवडसे' पृ. संख्या : १३५, मूल्य रु. १२५, 'आभास' पृ. संख्या : १९०, मूल्य : रु. २००, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, ०२०-२५५३७९५८)

## डॉ. प्रमोद किन्नरकर यांचा अमेरिकन वेल्डिंग सोसायटीतर्फे प्रतिष्ठेचे 'लाईफ मेम्बर' हे पद देऊन सन्मान

हिन्दु हायस्कूलचे एक माजी हुषार विद्यार्थी डॉ. प्रमोद किन्नरकर हे सध्या गोव्यांत स्थायिक झालेले आहेत. आय.आय.टी. पवई येथून मेटेलर्जी या विषयांत त्यांनी डॉक्टरेट मिळविलेली आहे. फिलिप्स या आंतरराष्ट्रीय उद्योग समुहाच्या ठाणे येथील वेल्डिंग रॉडस् बनविण्याच्या कारखान्यांत क्वॉलिटी कंट्रोल विभागाचे प्रमुख म्हणून सुरुवातीला त्यांनी काम केले. नंतर गोव्याला जाऊन १९८० साली ट्रान्सवेल्ड प्रॉडक्टस ही स्वत:ची कंपनी स्थापन केली व प्रथितयश उद्योगपती म्हणून नांव कमविले. इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनियर्स, इंडियन इन्स्टिट्युशन ऑफ मेटल्स, इंडियन इन्स्टिट्युशन ऑफ वेल्डिंग वगैरे अनेक संस्थांचे ते क्रियाशील सभासद होते. Confederation of Indian Industries (CIL) या शिखर संस्थेच्या गोवा शाखेचे ते प्रमुख होते. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या अनेक शिक्षण संस्थांशीही ते निगडीत होते. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत लिहिलेले तंत्रज्ञान विषयावरील सात लेख भारतातील व परदेशांतील नियतकालिकांतून प्रकाशित झालेले आहेत.

अमेरिकेत फ्लोरीडा येथील American Welding Society ही त्या क्षेत्रांतील जगभरातील एक नावाजलेली संस्था आहे. डॉ. किन्नरकर जेव्हा फिलीप्समध्ये होते तेव्हा १९७५ साली या संस्थेतर्फे त्यांना Certified and Designated Member ही मानाची संज्ञा दिली होती. अलीकडेच म्हणजे नोव्हेंबर २०१२ मध्ये FABTECH तर्फे नेवाडा येथे एक तीन दिवसांचे वार्षिक शिबीर व प्रदर्शन भरले होते. त्या प्रसंगी एका खास समारंभात डॉ. किन्नरकर यांच्या योगदानाबद्दल त्यांना प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'लाईफ मेम्बर' म्हणून स्वीकृत केले व अध्यक्षांतर्फे त्यांचा सन्मान करण्यांत आला.



## कु. संज्योत तेलंग हिचे पॅरीस येथे फोटोग्राफी स्पर्धेत स्पृहणीय यश

कारवारच्या जुन्या पिढीतील कै. रावबहादूर तेलंग म्हणजेच सर्वांना परिचित असलेले 'गणपमाम' ह्यांची पणती व आर्किटेक्ट सुधीर शंकर तेलंग ह्यांची धाकटी मुलगी संज्योत ही सध्या पॅरीस येथील जगविख्यात फोटोग्राफी इन्स्टिट्यूट "स्पीओस" मध्ये "युरोपियन मास्टर इन फोटोग्राफी" ह्या उच्च पदवीसाठी शिक्षण घेत आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या " P x 3" ह्या युरोपच्या फोटोग्राफी स्पर्धेमध्ये तिने पाठविलेल्या तीनपैकी तिन्ही विभागांमध्ये तिने एक सुवर्ण व दोन रौप्य पदके पटकावली. ह्या स्पर्धेसाठी ८५ देशांमधून हजारो फोटोग्राफर्सनी भाग घेतला होता. ह्या स्पर्धेतील संज्योतच्या तसेच इतर विजेत्या छायाचित्रांचे प्रदर्शन पॅरिसच्या एका प्रसिद्ध दालनामध्ये भरविण्यात येत आहे. www.sanjyottelang.com ह्या तिच्या वेबसाईटवर ही तशीच इतरही तिने काढलेली छायाचित्रे बघता येतील.

## कु. करण मुझुमदार याचे शालान्त परीक्षेत उज्ज्वल यश

वांद्रे येथे राहणारे डॉ. दत्तात्रय प्रकाश मुझुमदार हे मुंबईतील एक प्रथितयश न्युरोसर्जन आहेत. पेडियाट्रिक न्युरोसर्जरी या अति प्रगल्भ अशा क्षेत्रांत भारतांतील मोजक्याच तज्ज्ञांमध्ये त्यांची गणना होते. ते अनेक अग्रगण्य हॉस्पिटल्समध्ये कन्सल्टेशन करतात. जी.एस.मेडीकल कॉलेजमध्ये न्यूरोसर्जरी विषयातील प्राध्यापक म्हणून ते अध्यापन करतात.

डॉक्टरांचा मुलगा करण हा बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधील आर्य विद्या मंदीरचा विद्यार्थी. करण याने यंदा ICSE बोर्डाच्या शालांत परीक्षेत ९६.२५% गुण मिळविले व शाळेतून तो द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तो उत्तम जलतरणपटू असून आंतरशालेय स्पर्धेत राज्य पातळीवर त्याला अनेक सुवर्ण व रौप्य पदके मिळालेली आहेत.

करण हा ग्लॅक्सो कंपनीचे निवृत्त व्हाईस प्रेसीडेंट डॉ. प्रकाश दत्तात्रय मुझुमदार यांचा नातू व प्रसिद्ध साहित्यिक डॉ. अ.वा. वर्टी यांचा पणतू होय.

## पंधरा वर्षीय शांतनू नाईक यांचा 'नारी' हा लघुपट

'कोकम' फेम साहित्यिक कै. आनंद वर्टी यांचा पंधरा वर्षांचा नातू कु. शांतनू राजेश नाईक याने 'नारी' हा एक लघुपट तयार करून आपल्या कलाप्रिय आजोबांचा वारसा पुढे चालविला आहे. महिलांवरील अत्याचार, त्यांची मुस्कटदाबी यांचे यथोचित चित्रण करणाऱ्या या लघुपटाने केवळ चार दिवसात यु-ट्यूबवर चारशे हिट्स मिळविलेली आहेत. हा लघुपट म्हणजे सबकुछ शांतनू. संकल्पना, चित्रीकरण, संकलन, संगीत. बहीण भार्गवीसह अभिनय वगैरे सगळे शांतनू याचेच. हा लघुपट www.bit.ly/naari या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

# मुंबई मंच : उत्सव २०१३

मंबई मंचाच्या सहाव्या वर्धापनदिनानिमित्त एक नृत्य व संगीतमय कार्यक्रम - उत्सव २०१३ - माटुंगा येथील कर्नाटक सभागृहात शनिवार दिनांक १ जून रोजी दिमाखात साजरा झाला. सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक व अभिनेता श्री. विजय केंकरे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती हे यंदाचे वैशिष्ट्य.

प्रथेप्रमाणे कुलदैवतांचे आशीर्वाद घेऊन प्रमुख पाहुणे श्री. विजय केंकरे यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यां समवेत दीप प्रज्ज्वलन झाले. कार्यक्रमाच्या निवेदिका कु. मुग्धा वैद्य हिने आपल्या खास शैलीत सर्वांचे स्वागत केले. श्री. विजय केंकरे यांचे स्वागत उपस्थितांनी उभे राहून केले व अशाप्रकारे सन्मान प्रथमच झाल्याने आपण भारावून गेल्याचा उल्लेख त्यांनी आपले मनोगत सांगताना केले. तसेच नाट्यक्षेत्रातील गमतीदार अनुभव कथन करून मंचाच्या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात श्री. गिरीश दळवी यांच्या गणेश वंदनाने झाली. त्यांच्या पत्नी सौ. प्राची व कन्या कु. प्रियांका यांनी सुरेख नृत्य सादर केले. आंतरशालेय नाट्यछटा स्पर्धा विजेती कु. ऋतुजा धुमे हिने स्त्रीमुक्तीवरील भाष्य करणारे भारुड सादर करून प्रेक्षकांना मुग्ध केले तर कु. समीक्षा पालेकरने सिने संगीतावरील नृत्याने वाहवा मिळविली. कु. रेवा नाडकर्णी, कु. मानसी नाडकर्णी, कु. पूर्वी कामत व कु. स्तुती नाडकर्णी यांच्या रासलीलेवर आधारीत अप्रतिम समूह नृत्याला रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. वयाची पन्नाशी ओलांडलेल्या श्रीमती सुचेता सोहोनी यांनी आपल्या नृत्य कौशल्याने तरुण कलाकारांना आव्हान देत हम भी कुछ कम नही हे दाखवून दिले. श्री. दिनकर कुलकर्णी यांनी विनोदी चुटकुले व कविता पेश करून खसखस पिकविली.

शास्त्रीय संगीत गायिका संगीत विशारद व संगीत अलंकार सौ. स्मिता वाघ यांनी आयोजित केलेला संगीतमय कार्यक्रम हे मध्यंतरानंतरचे खास आकर्षण होते. प्रेक्षकांचे वय लक्षात ठेऊन अजरामर झालेल्या जुन्या हिंदी गाण्यांचा नजराणा त्यांनी प्रस्तुत केला. पायलिया झनकार हे फ्युजन, आयेगा आनेवाला, आजा रे परदेशी, आपकी नझरोंने समझा ही सदाबहार गीते सौ. स्मिता वाघ यांनी गायिली. त्यांच्या कवीवर्य सोयरू बर्वे यांचे साद तुगेली ऐकूक आयली या कोकणी गाण्याने सर्वांना खूष केले. अजीब दासताँ है ये, आइये मेहरबान ही गाणी सौ. प्रज्ञा वागळे यांनी सादर केली. जलते है जिस के



लिये हे गाणे श्री. रोहित बोरकर याने हुबेहुब तलतच्या आवाजात गाऊन 'वन्स मोअर' मिळविला सहकलाकार श्री. शेखर दामले (आपके हसीन रूख) व कु. उमा पंडित (अच्छा जी मैं हारी) यांन ये गत भीगी भीगी व ये रातें ये मौसम ही द्वंद्व गीते गाऊन कार्यक्रमात रंगत आणली. सर्व गाण्यांना टाळ्यांचा ठेका धरत उपस्थितांनी सुरेख दाद दिली. कजरा मोहब्बतवाला हे गीत सौ. स्मिता वाघ व कु. उमा पंडित सादर करताना श्रीमती सुचेता सोहोनी व सौ. प्राची दळवी यांनी उत्स्फूर्तपणे नृत्यही केले. या संगीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मंजिरी कुलकर्णी व सौ. प्राची दळवी यांनी अत्यंत खुमासदारपणे केले.

श्री. संजय नाडकर्णी यांनी आभार प्रदर्शित करताना सर्व कलाकार व उपस्थित रसिकजन तसेच कार्यक्रमाचे प्रायोजक एन.के.जी.एस.बी. बँक व शामराव विठ्ठल बँक आणि निमंत्रण पत्रिकांचे प्रायोजक मांगसिद्धेश इन्वेस्टमेंट प्रा. लिमिटेड या सर्वांना धन्यवाद दिले. मुंबई मंचाच्या नवीन पदाधिकाऱ्यांनाही त्यांनी शुभेच्छा दिल्या . या सुंदर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

- डॉ. विवेक कुलकर्णी,
दादर

**Shailesh Gaitonde**
**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

## विवाह / वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| संपदा नागेश (विजय) बोरकर, पुणे | व | अक्षय अभय नाडकर्णी, माहीम |
| शंकर (नमीत) महाबळेश्वर बोरकर, मुलुंड | व | योगेश्री सुरेश पार्सेकर, गोवा |
| दुर्गेश (किरण) अशोक गायतोंडे, जोगेश्वरी | व | रुपाली अरुण सच्चर, जम्मू |
| पल्लवी श्रीकांत गायतोंडे, बडोदा | व | विमल नल्लपन्, कोईमतूर |
| अक्षता नितीन गंडभीर, सांताक्रूज | व | अमेय अशोक खांडेकर, ऑस्ट्रेलिया |
| केदार सुधीर कसबेकर, गिरगांव | व | ऊर्मिला गोपाळ शेणॉय, कुर्ला |
| बाळकृष्ण शिवकुमार नाडकर्णी, सानपाडा | व | शालिनी अमिंदर सिमरेणु, बँकॉक |
| विहंग (शेखर) प्रमोद नाडकर्णी, अंधेरी | व | पूजा प्रफुल्लचंद्र पोतनीस, गोरेगांव |
| मंगेश वामन (विकास) नाडकर्णी, दादर | व | मनस्वी महेन्द्र कसबेकर, पुणे |
| अनुया सुरेश नाडकर्णी, जोगेश्वरी | व | प्रसाद जयकृष्ण केंकरे, गोवा |
| वरदा (मीरा) रामदास नाडकर्णी, पारले | व | कैलास सखाराम नाबर, गोरेगांव |
| अर्चना सुरेन्द्र रेगे, प्रभादेवी | व | अश्विंदर सिंग, शीव |
| निखिल दिलीप सोहोनी, प्रभादेवी | व | श्रुती वासुदेव सबनीस, पारले |
| नकुल सुधीर तेलंग, बोरीवली | व | प्रीती श्रीश कामत, बोरीवली |
| सोनल नितीन वागळे, नाशिक | व | मंगेश शाळिग्राम (शाम) वागळे, प्रभादेवी |
| प्रियांका गिरीश वर्टी, पुणे | व | स्वप्नील संजय बर्वे, पुणे |


**a-zmarriage.com**

***All prospective Brides and Grooms your search for life partners ends here at***

**a-zmarriage.com**

*Please Contact :*

***Mrs. Gauri Kamat, Malad : 28441487/ 9619454343***




## कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धा

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही संघाच्या विद्यमाने संस्कृत पाठांतर स्पर्धा आयोजिण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे यंदाही स्पर्धकांसाठी दोन गट पाडलेले आहेत. पण शिशु गटातील कुठल्याही स्पर्धकास कुमार गटातही भाग घेण्यास मुभा आहे. प्रत्येक गटासाठी तीन पारितोषिके आहेत. पूर्व तयारी करण्यासाठी स्पर्धकांनी लवकरात लवकर पण १६ सप्टेंबर २०१३ पर्यंत आपली नांवे पत्राने अथवा फोनवर (२३८७७३०१) श्रीमती भांडारकर यांच्याकडे नोंदवावी व थेट स्पर्धेच्या ठिकाणी हजर राहावे.

**स्पर्धेची वेळ** : रविवार २२ सप्टेंबर २०१३, संध्याकाळी ४.३०

**स्पर्धेचे स्थळ** : दामले सभागृह, मनमाला टँक रोड, माहीम, (पृ. १४ वर नकाशा पाहणे)

**शिशु गट : इयत्ता ४ थी पर्यंत**

पर्याय क्र. १ : **ॐ भूर्भुवः स्वः**
**तत्सवितुर्वरेण्यम्**
**भर्गो देवस्य धीमहि**
**धियो यो नः प्रचोदयात्।**
**(वरील गायत्री मंत्राचे ५ वेळा पठण करावे.)**

पर्याय क्र. २ : आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम्।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति।।
किं कुलेन विशालेन विद्याहीनस्य देहिनः।
अकुलीनोऽपि विद्यावान् देवैरपि स पूज्यते।।
सुखार्थी त्यजते विद्यां विद्यार्थी त्यजते सुखम्।
सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम्।।
दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलम्।
बलं मूर्खस्य मौनत्वं चौराणाम् अनृतं बलम्।।

कुमार गट : इयत्ता ५ वी ते १०वी पर्यंत

पर्याय क्र. १ : अर्थातुराणां न गुरुर्न बन्धु:।
कामातुराणां न भयं न लज्जा।।
विद्यातुराणां न सुखं न निद्रा।
क्षुधातुराणां न रुचिर्न वेला।।

परोपकाराय फलन्ति वृक्षा:।
परोपकाराय वहन्ति नद्य:।।
परोपकाराय दुहन्ति गाव:।
परोपकारार्थम् इदं शरीरम्।।

काकस्य गात्रं यदि काञ्चनस्य।
माणिक्यरत्नं यदि चञ्चुदेशे।।
एकैकपक्षे ग्रथनं मणीनां।
तथापि काको न तु राजहंस:।।

पर्याय क्र. २ : अतिपरियचयादवज्ञा संतत गमनादनादरो भवति।
मलये भिल्लपुरंध्री चंदनतरु काष्ठमिन्धनं कुरुते।।
शरदि न वर्षति गर्जति वर्षति वर्षासु नि:स्वनो मेघ:।
नीचो वदति न कुरुते न वदति सुजन: करोत्येव।।
आपदि मित्रपरीक्षा शूरपरीक्षा रणाङ्गणे भवति।
विनये वंशपरीक्षा स्त्रिय: परीक्षा तु निर्धने पुंसि।।

## श्रद्धांजली

### कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)


२८ वे पुण्यस्मरण. मृत्यु : रविवार २८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणींशिवाय गेल्या २८ वर्षांत एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी, अमेरिका



## संस्कृत पाठांतर स्पर्धेचे कार्यस्थळ दामले सभागृह




Contact : Priya Prakash Telang

SHANTA CREATIONS

Shanta™

DIGITAL MEDIA
- Website Designing & Development
- Flash Web Banners and Presentation
- Optimised Flash Website
- and more..

PRINT MEDIA
- Brochure Designing
- Catalogues & Product Box Designing
- Outdoor Media
- and more...

3D & VFX
- 3D Modeling, Texturing, Rigging, Lighting
- 3D Animation
- 3D Architectural Walkthrough
- 3D Motion Graphics
- Visual Effect
- and more....

SHANTA I PORTAL PVT. LTD.
Roman House, Opp. Tera Panth Bhavan, Nr. Cambridge School,
Thakur Complex, Kandivali (E), Mumbai - 400 101.
Cell : 93215 95487 / 98202 33202 • Tele/Fax . 022-2854 2421
www. shantacreations.com • info@shantacreations.com

## "निसर्गाचं नयनरम्य लेणं - कारवार" - एक रसग्रहण

आजी, मावशी, आत्या यांसारख्या नात्यांची ओढ आपल्या मनात असली, तरी आईसाठी अंत:करणातील एक कोपरा निरंतर हळव्या भावनेने व्यापलेला असतो! 'मेरा भारत महान!' ही भावना सदैव मनात जागत असली, तरी आपल्या मूळ गावाची ओढ तशाच प्रकारे हृदयात स्थान मिळवून राहिलेली असते! जुन्या पिढीची मुळं त्याच मातीत रुजलेली असल्यामुळे वेळात वेळ काढून एखादी धावती, चुटपुटती का होईना, भेट देऊन गावाचं दर्शन घेण्याची संधी त्यांच्याकडून साधली जाते. पण नव्या पिढीतल्या मुलांचं, नातवंडा-पंतवंडांचं काय ? ज्या गावात वासच झाला नाही, त्याच्या सहवासाची माया त्यांच्या मनात निर्माणच कशी होणार ?

अशा या नव्या पिढीला आपल्या कारवारचं दर्शन घडविणारा एक आरसाच जणू काही 'श्री विठ्ठलराय भट व श्री. किरण (राजेश) दिवेकर या संपादक-द्वयीने, 'निसर्गाचं नयनरम्य लेणं - कारवार' या पुस्तिकेच्या रुपाने तिच्यापुढे धरला आहे, असं म्हणता येईल! आपल्या मनोगतात त्यांनी स्पष्टच केलं आहे, 'नव्या पिढीच्या मनातील आपल्या या मूळ भूमीबद्दलचं कुतूहल शमविण्याचा प्रयत्न करण्यासाठीच या पुस्तकाचा प्रपंच!'

पुस्तक हातात घेताच कारवारमधील रम्य देखाव्यांचे मुखपृष्ठ व मलपृष्ठावरील देखणी दृश्यं लक्ष वेधून घेतात. तो निळाशार फेसाळ सागर, किनाऱ्यावर विखुरलेली रुपेरी वाळू, मस्तकी हिरवाईचा मुकूट धारण करणारे डोंगर, नारळाची डौलदार झाडं, सारं मनाला मोहवून टाकतं! पुस्तकाच्या आतील कूर्मगड आणि कारवार व सदाशिवगड यांना जोडणारा पूल, देखणा सागर किनारा वगैरेंची छायाचित्रेही लोभस वाटतात!

कारवारमध्ये समाविष्ट असलेल्या खेड्यांची, ग्रामपंचायतींची नामावली, व्यवसाय-उद्योगधंद्यांची माहिती, इथल्या भूमीत बहरणारी नानाविध फुलं-फळं, जिह्वालौल्य पुरविणारी विविध प्रकारची मासळी, येथे केले जाणारे स्वादिष्ट पदार्थ आणि त्यांचा आस्वाद घेऊन प्रसन्न चित्ताने आनंद लुटू देण्यासाठी होत असलेली नाटकं, यक्षगान या साऱ्यांशी परिचय करून देण्याचं काम या पुस्तकाने केलं आहे, तेही कोंकणी, मराठी व इंग्रजी तीन भाषांचा गोफ विणून!

श्री. कृष्णानंद बांदेकर यांनी केलेलं कोंकणी म्हणींचं संकलन, श्री. कृष्णानंद अणवेकरांनी करून दिलेली देवालयांची ओळख आणि सौ. सिंधू दुभाषी यांनी इथे वर्षभर साजरे केल्या जाणाऱ्या सणांचं केलेलं तपशीलवार वर्णन ज्ञानात नक्कीच भर घालून जातं! 'कारवारचा लोकवेद' हा सौ. उषा राणे यांचा मौलिक माहिती देणारा, तर सौ. शीला कोळंबकर यांचा कारवारी लोकांच्या संस्कृतीवर प्रकाशझोत टाकणारा असे दोन्ही लेख वाचनीय आहेत. बालपणीच्या आठवणी म्हणजे जणू काही



गाभुळलेल्या चिंचाच! सौ. नीलिमा नाडकर्णी यांच्या लेखात त्यांचा आस्वाद घेता येतो. श्री. दत्तात्रेय नाडकर्णी यांनी सांगितलेली 'विरलेल्या स्वप्नांची कहाणी' व 'कारवार वर्णन' ही त्यांच्या संग्रहातील 'बाबा गर्दे' यांची कविता मनाला टोचणी लावल्यावाचून राहात नाही! पद्मभूषण डॉ. दुभाषी यांच्य 'Karwar in my heart' या लेखातील त्यांचं कारवारशी असलेलं भावुक नातं आणि श्री. बी.बी. राणे यांच्या 'Reminiscences of Karwar, Past and Present' या लेखातील भूतकाळाच्या सुखद स्मृती व आताच्या कारवारमधील बदलांमुळे होत असलेला खेद हे सारं मनाला स्पर्शून जातं! श्री. विठ्ठलराय भट यांच्या सुंदर लेखातून कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, आचार्य अत्रे, म.म.द.वा. पोतदार, श्री. म. माटे यांच्यावर या 'दक्षिणेकडील काश्मीर'ने कशी मोहिनी घातली, ते कळून येतं! प्रख्यात कोंकणी साहित्यिक श्री. महाबळेश्वर सैल यांचा 'सृजन-ऊर्जा' हा काहीसा वेगळा माहितीपर लेखही पुस्तकात अंतर्भूत आहे.

याखेरीज, या पुस्तकाची 'मानचिह्नंच' म्हणता येतील अशा तीन खास लेखांचाही येथे अंतर्भाव केलेला आहे.

कारवार-दर्शनाने 'कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथ टागोर' लोभावून गेले होते, हे तर सर्वश्रुतच आहे. पण कारवारहून येताना परतीच्या प्रवासातच 'प्राकृतिर प्रतिशोध' हे गीत लिहून त्यांनी आपल्या साहित्यिक जीवनाचा श्रीगणेशाच केला, हे सांगणाऱ्या एका सुरेख लेखामुळे पुस्तकाला एक आगळंच सौंदर्य लाभलं आहे.!

'कारवार-सृष्टीचा अलंकार', हा सुप्रसिद्ध लेखक रवीन्द्र पिंगे यांचा लेख कारवारचं, आणि तिथल्या लोकांचं केलेलं सूक्ष्म निरीक्षण हे या लेखाचं वैशिष्ट्य आहे. १९९९ सालच्या दिवाळी अंकातील उत्कृष्ट ठरलेला हा लेख मनाला अतिशय भावतो!

सदाशिवगडावर गेलेलं स्वत:चं बालपण आणि तिथलं तत्कालीन वातावरण मूर्तीमंत साकार करणारा आपल्या लाडक्या 'पु.लं.'चा लेख तर आपल्या 'मर्मबंधातली ठेव'च होऊन जातो!

पुस्तकाच्या संपादकांपैकी श्री. विठ्ठलराय भट हे तिथलं वास्तव्य केलेले प्रथितयश साहित्यिक! श्री. किरण (राजेश) दिवेकर यांचं तिथलं वास्तव्य अत्यल्प असलं, तरी कारवारबद्दल वाटणाऱ्या आन्तरिक ओढीमुळेच आपल्या या गावच्या साऱ्या वैशिष्ट्यांना शब्दबद्ध करून पुस्तकरूपात चिरंतन करावं, असा ध्यासच घेतलेले! या दोघांच्या सहकार्यामधून व परिश्रमांमधून साकार झालेली ही साहित्यकृती प्रत्येक कारवारी मनाला नक्कीच आनंदाचा व पुन:प्रत्ययाचा अमृतानुभव देईल! (अर्थात्, या पहिल्याच प्रयत्नात आढळलेल्या काही त्रुटी व मुद्रणदोष पुढील आवृत्तीत नक्कीच सुधारले जातील!)

**- सौ. नीलिमा शशिकांत नाडकर्णी**

माहीम

## विजूले चुटकुले

बायल घोवाक : हांव पळैता की वेदोळच्यान तुमी मॅरेज सर्टिफिकेट शोधत आसात. इतले कसले आसा ताजे भीतर?

घोव : त्या सर्टिफिकेटांत एक्सपायरी डेट बरयल्ली आसा का पळैता.

---

बायल डॉक्टराक : मगेल्या घोवाक रात्री नीदाभीतर खूब बडबडची संवय आसा. ही संवय वतच्याक कस्लो उपाय?

डॉक्टर : उपाय सॉपो आसा. ताका दिवसां उलौची संधी मेळका.

- श्री. विजय सदानंद वागळे, ठाणे


।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**
**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov / Churma
- Dry Fish - Suke Bangde, Mori & Sungta

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

## रा. सा. जगन्नाथ मुझुमदार हे १९४१ साली कराची येथे नोकरीतून निवृत्त झाले तेव्हांचा निरोपाचा फोटो

१९४७च्या फाळणीपूर्वी कराची हा तेव्हांच्या मुंबई इलाख्याचा एक भाग होता. तेथे हजारो मराठी बांधव व अनेक सारस्वत कुटुंबे स्थायिक झालेली होती. तेथे रावसाहेब जगन्नाथ मुझुमदार, असि. सेक्रेटरी, पी.डब्लु.डी., हे एक फार मोठे प्रस्थ होते. त्यांच्याच पुढाकारानें १९२७ साली 'महाराष्ट्र मित्र मंडळ' ही संस्था स्थापण्यात आली होती. मार्च १९४१ मध्ये ते सरकारी नोकरीतून निवृत्त झाले तेव्हा कराचीतील मराठी मंडळींनी एक निरोपाचा समारंभ भरविला होता व त्यांना एक मानपत्र देण्यात आले होते. कराची येथील दाक्षिणात्य गौ.सा.ब्रा. समाजाचेही ते बरीच वर्षे अध्यक्ष होते. संघाच्या 'शारदा' त्रैमासिकांत त्यांचा शुभसंदेश छापून आलेला आहे.

**सत्तर वर्षापूर्वीचा हा फोटो तेथील कारवारी बांधवांनी त्यांना निरोप दिला तेव्हांचा आहे.**

**मागे उभे** : १. मोहन वा. गायतोंडे, २. प्रभाकर ना. नाडकर्णी, ३. कमलाकर पां. नाडकर्णी, ४. जयराम सा. रेगे, ५. सिद्धानंद वि. वागळे

**मागे उभे दुसरी रांग** : १. भास्कर वि. सुखटणकर, २. ?, ३. विश्वंभर कृ. पालेकर, ४. पुतुराव बा. गायतोंडे, ५. महाबळेश्वर शां. कुलकर्णी, ६. मोहन पु. मुझुमदार, ७. विनायक ना. सुखटणकर, ८. मनोहर मं. नाडकर्णी, ९. नागेश पां. नाडकर्णी, १०. सर्वोत्तम शां. कुलकर्णी, ११. वसंत खोत

**मागे बसलेले** : १. इंदु भा. सुखटणकर, २. वामन शां. गायतोंडे, ३. सिंधु पु. गायतोंडे (सिंधु दि. कुलकर्णी), ४. भास्कर द. कसबेकर, ५. मालती ज. मुझुमदार (शीला सी. कसबेकर), ६. मंगेश (काशा) गंडभीर, ७. सिंधु ज. मुझुमदार (सिंधु शहा), ८. रघुनाथ संजगिरी, ९. सुधा ज. मुझुमदार (सुधा प्र. कसबेकर)

**पुढे बसलेले** : १. कुसुम वि. सुखटणकर, २. शांताबाई (सुबी) वि. वागळे, ३. इंदिरा (मुक्ता) वसंत खोत, ४. इंदु भास्कर कसबेकर सोबत पुत्र जयंत, ५. जगन्नाथराव मुझुमदार, ६. शांताबाई ज. मुझुमदार, ७. येसुबाई पु. गायतोंडे, ८. दुर्गाबाई वा. गायतोंडे, ९. मुक्ताबाई वि. सुखटणकर

**जमिनीवर बसलेले** : १. विनय (मोरेश्वर) ना. नाडकर्णी, २. सिंधु खोत (सिंधु र. भेंडे), ३. सरोजिनी ज. मुझुमदार (ऊर्मिला र. परुळकर), ४. महेश वि. पालेकर, ५. उषा वि. वागळे (उषा बा. कुलकर्णी), ६. अरुण भा. कसबेकर, ७. सुलोचना पु. गायतोंडे, (सुलु/सुलोचना र. वाघ), ८. भालचंद्र ज. मुझुमदार, ९. अहिल्या ज. मुझुमदार (अनिला अ. आरस), १०. शामसुंदर खोत, ११. पुष्पा सुखटणकर (रोहिणी पागेदार)

**(प्रायोजन सौजन्य : अरुण भास्कर कसबेकर)**



## प्रिय बाबांस, जन्मशताब्दी निमित्त एक फुलपाकळी

(मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात स्व. कृपाकर गोविंद वागळे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांची ज्येष्ठ कन्या सौ. कल्पना आकेरकर यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. त्याच अनुषंगाने स्व. वागळे यांची धाकटी कन्या यांनी रचलेली ही कविता.)

त्रिवार वंदन करूनी तुम्हा मागते मी आशीर्वाद।
वाटते मला बाबा तुम्ही कधीतरी घालाल साद।।

फणसागत बाह्यांग तुमचे नी अंतरंग जसा गोड गरा।
आयुष्यातील आठवणींचा खळखळणारा तुम्ही धुंद झरा।।

कष्टी आर्यु वेचुन तुम्ही सुखी केले आम्हा चौघांना।
नि स्वखर्चाने बोलवून नोकरी दिली तुम्ही अनेकांना।।

बहुतांशनी जाण न ठेवली तुमच्या या सत्कार्याची।
म्हणूनच सांगत होता तुम्ही, "मी, नारी पोरी कडेच पहा सुखानी"।।

मृत काकांची आली रक्कम, तुम्ही न ती ठेवली।
संघास दान करूनी औदार्याची धुरी तुम्ही वाहिली।।

आईसारखी भार्या मिळाली, सुखी व संतुष्ट।
तिने संसार फुलवताना केले अपार कष्ट।।

आज तुमच्या शताब्दीला ओठ फक्त थरथरतात।
नी नयनातील आसवांना रोखण्याचा प्रयत्न करतात।।

अशा मातापितांपोटी जन्मून मी धन्य जाहले।
वाटे पाचू, माणिक, मोती, हीऱ्यातजणू मी नहाले।

नजर तुमची प्रेमळ, सदा असो आम्हा चौघांवर।
विनम्र होऊन त्या नजरेला, बाई, जोडले मी कर।।

(प्रायोजित)

- सौ. पूजा शरद गोठिवरेकर, बंगळूर
(स्व. कृपाकर वागळे यांची कन्या)
(०७२५९२०६०६९)

## प्रार्थना - श्रीमंगेशापाशी

मंगेशीच्या देवा तुला बेलफूल वाहू दे
अखंडीत कृपा तुझी आम्हावरी राहू दे।।१।।

कवळेच्या माते तुला जाई जुई चंपा वाहू दे
प्रेमामध्ये तुझ्या आम्हा नित्य न्हाऊ दे।।२।।

मुखी असो तुमचे नाम, करीत असता कामधाम
मायेची ती छाया तुमची, सदा असो दे।।३।।

कधी काळी घडता चूक, क्षमा करावी राहूनीया मूक
पाठीवरी मायेचा तो हात फिरू दे।।४।।

मंगेशीचा माझा पिता, कवळेची माझी माता
मुखी तुमचे नाव देवा, सतत राहू दे।।५।।

।।अखंडीत कृपा तुझी आम्हावरी राहू दे।।

## प्रार्थना - श्रीशांतादुर्गेपाशी

भेटाल कां कोणी माझ्या माऊलीला कवळेच्या
लेक सुखी आहे सांगा, सावलीत माऊलीच्या।।१।।

सांग माझ्या माऊलीला, वाट पाहते मी रोज
घरी येईल ती माझ्या उद्या नाही तरी आज।।२।।

वर्षे गेली, महिने गेले, रूप नाही दृष्टीस पडले
कां ग आई, माझ्या हातून असे काय पाप घडले।।३।।

ये ग, ये ग माझ्यासाठी, लवकर येई माझ्या घरी
प्रेमळ ग हात तुझा फिरेल मम पाठीवरी।।४।।

धन्य होईन मी माते, आहे प्रेमळ माझी माता
सफल जन्म होईल माझा, मोक्ष सुद्धा येईल हाता।।५।।

(प्रायोजित)

- ललिता सदानंद तेलंग (ठाणे)

# विवाह - संस्कार का करार ?

माझा गिरीजाशी (माहेरची आशा नागेश देसाई) झालेल्या विवाहाला २८ एप्रिल २०११ रोजी पन्नास वर्षे झाली. पण परदेशस्थ असलेल्या आमच्या दोन्ही मुलांना त्या तारखे दरम्यान रजा घेऊन भारतात येणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनीच आम्हाला त्यांच्या देशी हा सुवर्ण महोत्सवी वर्षाचा विवाह सोहळा साजरा करण्यासाठी आमंत्रित केले.

प्रथम आम्ही सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया येथे स्थायिक झालेली आमची कन्या निरुपमा (माधुरी) गोविंद कामत हिच्याकडे प्रयाण केले. तेथे पोहोचल्यावर एका सोयीस्कर दिवशी तिच्या राहत्या प्रशस्त बंगल्यात विवाहदिन सोहळा साजरा करण्यासाठी एक भोजन समारंभ आयोजित केला. तेथील आपल्या परिचीत मित्र मंडळींना (त्यामध्ये काही गौरवर्णीय पाश्चात्यही होते) आमंत्रित केले. रोषणाई, मंद सनईच्या सुरांतील पार्श्वसंगीत व अस्सल भारतीय पद्धतीचे भोजन अशा उत्साही वातावरणात, उपस्थित मंडळीच्या टाळ्यांच्या गजरात आम्ही विवाह वाढदिवसाचा केक कापला. भोजनाचा व पेयांचा आस्वाद घेत मंडळी इतस्त्त: फिरत आमच्यापाशी येऊन चार कौतुकाचे शब्द बोलून आम्हा दोघांचे अभिनंदन करीत होते. पण त्यातील एक पाश्चात्य पुरुष आमच्याशी हस्तांदोलन करीत हंसत म्हणाला, 'Fifty years of married life! Congratulations! But how can you tolerate each other for such a long time? Look here, I have got a third wife' आणि त्याने आपल्यापेक्षा बरीच लहान पण उंच व देखणी असलेल्या त्या तिसऱ्या पत्नीला जवळ बोलावून आमची ओळख करून दिली. तिनेही इतकी वर्षे आम्ही एकमेकांना सांभाळून घेतल्याबद्दल आमचे कौतुक केले व वर म्हणाली, 'We do find couples enjoying life together for such a long period here in USA but are in rarity nowadays. Divorce is not unknown here as you may know?'

अर्थातच मी उभयतांना सांगितले की आमच्या हिंदु धर्माप्रमाणे विवाह हा एक करार नसून तो एक पवित्र धार्मिक संस्कार आहे. व हे बंधन एकमेकांच्या गुणदोषासकट आम्ही स्वीकारतो व किंबहुना त्यामुळेच आमची कुटुंबव्यवस्था मजबूत पायावर उभी आहे. पण त्यांना ते कितपत पटले कोणास ठाऊक. पण तोंडाने 'चक चक' करीत कदाचित आमची कीव करीत काही उत्तर न देता त्यांनी निरोप घेतला.

सॅन फ्रान्सिस्को विमानतळावरून आमचा मुलगा मिलींद याच्याकडे जाण्यासाठी दुबईला जाणाऱ्या विमानात बसलो असताना आमच्या सीटच्या शेजारी एक सुस्वरूप गौरकाय सहप्रवासी तरुणी बसली होती. औपचारिक ओळख झाल्यावर आपल्या मैत्रिणीच्या लग्नाला फ्रान्सला जात आहे असे तिने



सांगितले. तिच्याबद्दल विचारले असता ती उद्गारली, 'I am not single and also not married. I have got a boyfriend and we live together' तिचे हे 'live-in-relationship' चे उद्गार ऐकल्यावर आमच्या सनातनी व पारंपरिक विचारसरणीला काहीसा धक्का बसला. विवाहपूर्वी असलेल्या 'live-in-relationship' ही प्रथा आपल्याकडेही बोकाळत आहे असे नंतर कळले.

दुबईतले मिलींदचे घर मुख्य शहरापासून दूर असलेल्या हिरवळीने व झाडीने वेढलेल्या गार्डनसिटीमध्ये आहे. मिलींदने व त्याची पत्नी उज्ज्वला (माहेरची उज्ज्वल कृष्ण वर्टी) हिने आमचा विवाहदिन सोहळा खाजगी व कौटुंबिक पद्धतीने करावा असे आम्हाला विचारून ठरविले. पण तो प्रसंगास अनुरुप व कायम स्मरणांत राहील असा व्हावा म्हणून समुद्रात बोटीच्या डेकवर व्हावा असा बेत आखला. मिलींद, उज्ज्वला तसेच आमची खट्याळ पण गोड नातवंडे सतेज व सारिका यांच्यासह आम्ही सहाजण एका संध्याकाळी दिव्यांच्या रोषणाईने सजविलेल्या एका बोटीच्या डेकवर स्थानापन्न झालो. अरबी व इतर काही परदेशी प्रवासीही सभोवताली डेकवर होतेच. बँडच्या आवाजात बोट हळुहळु किनाऱ्यापासून दूर जाऊ लागली. बोट जशी मार्गस्थ झाली तेव्हा व्यवस्थापकास अगोदर कळविल्याप्रमाणे त्याने एक सुंदर सजविलेला वाढदिवसाचा केक मध्यभागी आणून ठेवला व सर्वांना ऐकू येईल अशा रीतीने आम्हां उभयतांची नावे घेऊन विवाहाची ५० वर्षे झाल्याबद्दल केक कापणार हे जाहीर केले. आम्ही जसे केक कापण्यास सज्ज झालो तसे बाजूच्या सर्व सहप्रवाशांनी उभे राहून टाळ्या वाजवत मानवंदना दिली. आम्हा दोघांना हे कल्पनातीत झालेले स्वागत पाहून कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. कापलेला केक सर्वांना वाटण्यासाठी आमची दोन्ही उत्साही नातवंडे कामास लागले. सतेज जवळच्या टेबलाकडे दोन गलेलठ्ठ बायकांना घेऊन बसलेल्या अरबाकडे केक देण्यास गेला व हंसत हंसत परत माझ्याकडे आला व आमची थट्टा करीत म्हणाला, 'आबू, तो विचारतो की तुमच्या कितव्या बायकोचा हा पन्नासावा लग्नाचा वाढदिवस आहे. आबू, तुम्ही आणखी लपवून ठेवलेल्या आज्या असतील तर आम्हाला दाखवा. मी कोणाला, सांगणार नाही.' अरबांमध्ये एकापेक्षा अधिक म्हणजे चारपर्यंत बायका करू शकत असल्याने त्या अरबाने हा प्रश्न विचारणे स्वाभाविक होते. पण आमच्या गोटात मात्र मोठा हशा पिकला.

भारतामध्ये घटस्फोटाचे कायदे कडक आहेत व घटस्फोट सहजगत्या मिळत नाहीत. तसेच द्विभार्या प्रतिबंधक कायदापण अस्तित्वात आहे. पण या सर्व समजुती व प्रथेला छेद देणारे अनुभव मला वर निर्देशिलेल्या घटनांवरून आले. तेव्हा विवाह हा संस्कार की करार यावर आपणच विचार करावा.

(प्रायोजित)

**- शंकर मंजुनाथ वागळे,**
वांद्रे

## राममास्तर यांच्या वास्तूचा जीर्णोद्धार

कारवारमधून गेल्या अर्ध शतकात झालेल्या आपल्या ज्ञातिबांधवांच्या स्थलांतराविषयी मी आतापर्यंत आपल्या मुखपत्रिकेतून तसेंच संघाच्या अमृत महोत्सवाच्या स्मरणिकेतून लेख लिहून त्याविषयीच्या माझ्या व्यथा व भावना व्यक्त केल्या आहेत.

परंतु प्रत्येक बऱ्या-वाईट घटनेस जसा अपवाद आढळतो तसेच ह्याबाबतीतही कौतुकास्पद गोष्ट घडली आहे. पाच-सहा वर्षांमागे पुण्याचा एक सुपुत्र व कारवारच्या श्री. रामदास वा. हळदीपूरकर ह्यांचा जावई प्रसिद्ध कराटेपटू सलील श्रीपाद नाडकर्णी ह्यांने कारवारमध्ये शिरवाड येथे स्वत:चे घर बांधले व ह्याविषयी त्याने मुखपत्रिकेतून लेख लिहिला होता. हे हल्लीचे पहिले उदाहरण.

आणि आता माझ्या दृष्टीकोनातून दुसरी अत्यंत कौतुकास्पद व्यक्ती म्हणजे श्री. शैलेश शांताराम (कालिदास) बोरकर, विलेपार्ले (पू) मुंबई येथील रहिवासी, जुन्या पिढीतील श्री. राममास्तर ह्या नांवाने परिचित कै. श्री. राम बोरकर व कै. अपाक्का ह्यांचा नातू व श्री. कालिदास व श्रीमती मृणालिनी बोरकर ह्यांचा पुत्र. त्याने ह्या कारवारकरांच्या स्थलांतराच्या जमान्यात चक्क आपल्या पूर्वजांचे जुने घर पाडून त्या जागी संपूर्णतया सुंदर, छान, टुमदार अशी नवी वास्तू उभी केलीय. वास्तुशांति व गृहप्रवेश दि. २७-५-२०१३ रोजी गोव्यातील श्रीशांतादुर्गा कवळे येथील पुरोहित श्री. श्रीकुमार शां. सरज्योतिषी ह्यांच्याकडून व्यवस्थित होम-हवन व सर्व धार्मिक विधींसह पार पाडला.

श्री. कालिदास बोरकर सुट्टीत सहकुटुंब इथे राहायचे. त्यांना ह्या वास्तूविषयी खूप जिव्हाळा होता. आपल्या पूर्वजांची ही वास्तू विकू नये ही त्यांची इच्छा मुलगा शैलेश ह्याच्या मनात खोलवर रुजली होती. म्हणून सर्व आधुनिक सोयी-सुविधांसह त्याने हे घर उभारले. ह्यामागे त्याचा उदात्त हेतुसुद्धा आहे. त्याचे जवळचे नातेवाईक पालेकर (तोडूर) व बोरकर (कोडीबाग) तसेच अन्य नातेवाईक ह्यांनी काही दिवसांसाठी निवांतपणे इथे वास करावा, त्यांनी यावं नि राहावं.

आज त्यांने ती जमीन व घर विकलं असते तर सहज एक ते दोन कोटी रुपये त्याला मिळाले असते. परंतु त्याने वडिलांची इच्छा म्हणून स्वखर्चाने इथे निवासाची सोय केली. वडिलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी "कालिदास" असे वास्तूचे नामकरण केले. किती अभिमानास्पद!

मला नेहमी वाटायचे आपल्या कारवारकरांनी आपल्या जमिनी-घरे विकायला नको होती. त्यांनी कारवारला परतायला हवे होते. आज कारवारला मूळ कारवारकरांची खूप आवश्यकता आहे. परंतु आता खूप उशीर झालाय आणि म्हणूनच मला शैलेशचे खास कौतुक वाटते. ज्यांना अजूनही शक्य आहे त्यांनी त्याचे अवश्य अनुकरण करावे, म्हणून हा लेखन प्रपंच.

**- शांताराम (अरुण) कुलकर्णी**
कारवार



## कै. विजय नाडकर्णी, प्रिय राजाभाऊ, यास स्मृतीसुमनांजली

५ फेब्रुवारी २०१३ रोजी सकाळीच माझी कन्या सौ. शर्मिला हिचा फोन आला आणि तिने माझ्या प्रिय भावाच्या म्हणजे राजाभाऊच्या दु:खद निधनाची बातमी सांगितली आणि आम्हाला धक्काच बसला. आम्ही दोघे तडक माहीम येथील शांती सोसायटींत गेलो. तेव्हा अनेक नातेवाईक, असंख्य मित्रमंडळी, सोसायटीतील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हीच त्याच्या लोकप्रियतेची पावती. त्याच दिवशी शिवाजी पार्क येथील विद्युतदाहिनीत त्याचा अंत्यसंस्कार करण्यात आला आणि आमच्या प्रेमळ राजाभाऊचे इहलोकीचे युग संपले.

राजाभाऊचे पूर्ण नांव म्हणजे विजयकुमार बाळकृष्ण (बाळमाम) नाडकर्णी. त्याचा जन्म २८ ऑक्टोबर १९३४ चा. जोगेश्वरी येथील सरस्वती बाग येथे तो लहानाचा मोठा झाला. त्याला क्रिकेटची प्रचंड आवड. सरस्वती बागेच्या विस्तीर्ण पटांगणातून व पारले टिळक विद्यालयातून त्याने आपली क्रिकेटची आवड जोपासली. मग त्याने जोगेश्वरीच्या इस्माईल कॉलेजमधून सलग चार वर्षे अॅथलेटीक्समध्ये चॅम्पियनशिप मिळविली. त्याला पुष्कळ कप्स व शील्डस मिळाली होती. महाराष्ट्राचे नायब राज्यपाल डॉ. हरेकृष्ण मेहताब व अनेक मान्यवरांच्या हस्ते मिळालेली बक्षिसे त्यांने जपून ठेवली होती. मुंबई विद्यापीठाच्या क्रिकेट टीममध्येही त्याची निवड झाली होते. शिवाय कांगा लीगमध्ये 'एव्हरग्रीन क्रिकेट क्लब' मधूनही तो खेळायचा. मागे एकदा सुनील गावसकर असलेली भारताची टीम पाकिस्तानांत गेली होती तेव्हा राजाभाऊ इस्माईल कॉलेजमधील मित्र झेन याच्या कराचीतील घरी पाहुणा म्हणून राहून कसोटी सामना बघून आला होता. झेनसुद्धा परिवारासह भाऊकडे शांती सोसायटीत अगत्याने राहून गेलेला आहे. क्रिकेटाशिवाय त्याला इतर खेळांचेही आकर्षण होते. चेंबूर गोल्फ क्लबमध्ये गोल्फ व शिवाजी पार्कवरील पार्क क्लबमध्ये इनडोर गेम्स खेळून त्याने आपले क्रीडा विश्व चालूच ठेवले होते.

बी.एस्स.सी. झाल्यावर बाबांनी राजाभाऊला एक वर्षासाठी कानपूर येथे पेन्ट टेक्नॉलॉजी शिकण्यास ठेवले. तो कोर्स पूर्ण करून बाबांच्याच एलिफंटा ऑईलमध्ये नोकरीला लागला. तेथून तो अधिक अनुभवासाठी इंग्लंडमध्ये हल या ठिकाणी गेला. तेथून परतल्यावर अनेक नामांकित पेन्ट कंपनीत थोडा थोडा अनुभव घेऊन नंतर महिन्द्रा इंटरनॅशनल ट्रॅक्टर या कंपनीत रुजू झाला व उप महाव्यवस्थापक या पदावरून वयाच्या साठाव्या वर्षी निवृत्त झाला.

राजाभाऊला संगीताची व कलेचीही फार आवड. सेवेतून निवृत्त झाल्यावर त्याने वृंदावहिनीसह

सत्यनारायणाची पुजा केली त्यावेळी प्रख्यात गायिका आशाताई खाडिलकर यांच्या नाट्यगीतांचा सुश्राव्य कार्यक्रम पं. शंकरराव अभ्यंकर यांच्या उपस्थितीत त्याने ठेवला होता. पं. भीमसेन जोशी त्याचे आवडते. त्यांच्या संग्रही त्यांच्या कितीतरी कॅसेटस् होत्या व तो त्या सतत ऐकत असे.

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील गणेशोत्सवात त्याची एक पूजा ठरलेली असे. मंगेशीला जाऊन भक्तीभावाने अभिषेक करण्यास त्याला फार आवडायचे. पूर्वी दरवर्षी तो वृंदावहिनी व शशीताई करूर यांच्यासह गोव्यातील मेहुणे श्री. अरविंद वागळे यांच्याकडे गणेशोत्सवास नेहमी जायचा व तेथूनच कधीकधी आपला मूळ गांव अगळी येथे जाऊन चुलतभाऊ शिवानंद यास अगत्याने भेटून यायचा.

इस्माईल कॉलेजच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या सोहळ्याच्या वेळी तो कार्यक्रम व्यवस्थापक मंडळात होता. त्यावेळी कॉलेजचे माजी विद्यार्थी व मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले कॉलेजच्या मैदानावर हेलीकॉप्टरने उतरून आपल्या अंगरक्षकांसह मोटारीच्या ताफ्यात मुख्य कार्यक्रमाच्या शामियान्यात प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. नंतरच्या सत्रात कॉलेजचे आणखी एक माजी विद्यार्थी पु.ल.देशपांडे यांचे विनोदप्रचुर भाषण झाले. संध्याकाळी प्रसिद्ध गायक तलत महमूद यांचा सुमधुर हिंदी सिनेसंगीताचा कार्यक्रम झाला. राजाभाऊंमुळेच आम्हा तीनही बहिणींना या कार्यक्रमांचा लाभ घेता आला.

अलीकडे काही वर्षात राजाभाऊ तब्येतीने जरा थकल्यासारखा वाटत होता. मधुमेह व कंपवात या दुखण्यामुळे त्याचे हिंडणे, फिरणे मर्यादित झाले होते. वार्धक्याने अशक्तपणाचा त्रास होऊ लागला. अशा परिस्थितीत त्याची जीवनज्योत मालवली.

कै. राजाभाऊंच्या आठवणींना थोडाफार उजाळा देण्याचा हा प्रयत्न. आम्हा सर्व कुटुंबीयांतर्फे राजाभाऊला मनापासून स्मृतीसुमनांजली.

(प्रायोजित)

**- सौ. नीला मंगेश पिकळे**
चेंबूर

## वधूवर सूचक मंडळ

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात दिलेल्या भगिनींच्या नावांमध्ये खालील बदल झालेले आहेत. त्याची कृपया नोंद घ्यावी.

**ठाणे : सुलभा (सिंधु) कुलकर्णी** : २५४०३२०२
**मुलुंड : लता पिकळे** : २५६४०१७१



## रसिकाग्रणी दीपक बोरकर यांचे अपघाती निधन

प्रिय दीपक,

रविवार ७ जुलै रोजी दुपारी फोन खणखणला व तुझ्या अपघाती निधनाची बातमी समजली व धक्काच बसला. क्षणभर खरेच वाटेना. अद्यापही हे पत्र लिहिताना मी स्वप्नात नाही, जागाच आहे याची अधूनमधून खात्री करून घेत आहे. तुला अशी काय दुर्बुद्धी झाली की रेल्वेच्या पुलावरून न जातां तू रूळ ओलांडण्याचा अविचार केलास. ? तुझ्या घरातील अनुवंशिक परोपकारी स्वभाव पाहता आम्हाला पुसट शंका येते की रूळ ओलांडणाऱ्या एका व्यक्तीला वाचविण्याचा तुझा प्रयत्न होता व स्वतःचा जीव गमावून बसलास. खरी कींव येते ते तुझ्या आईची, सरोजनीकाकीची. 'काकी' आणि 'मायेस्त स्वभाव' म्हणजे एक समीकरणच. परोपकारार्थं इदं शरीरम् हे कुणीही तिला पढविलेले नसेल पण कुणाकडेही काही अडले, अडचण आली, अंथरुणाला खिळलेले असेल तर सर्वप्रथम धावणारी व्यक्ती म्हणजे काकी. उतार वयांत तिच्या नशिबी असा धक्कादायक पुत्रशोक यावा याहून आणखी काय मोठा दैवदुर्विलास ?

तूं एक रसिकाग्रणी होतास यात शंका नाही. साहित्य, संगीत, कला यात तुझे तसे प्रत्यक्ष योगदान नव्हते. पण तानसेन नसलास तरी तू अव्वल दर्जाचा कानसेन नक्कीच होतास. ज्ञातीची वार्षिक सहल म्हणजे जणू पंढरपूरची वारी. पंढरपूरला जाण्यासाठी जशा ज्ञानोबाच्या आळंदीहून व तुकोबाच्या देहूवरून दोन मुख्य दिंड्या निघतात त्याप्रमाणे आमच्या सहलींनाही दोन दिंड्या निघतात, माहीमहून व ठाण्याहून. त्यातील माहीमच्या दिंडीचा म्होरक्या तूं. प्रत्यक्ष सहलीच्या दरम्यान कविता, चारोळ्या, विनोद, पीजे, उखाणे, नकला यामुळे तू सहलीत जान आणायचास. यापुढे आमच्या सहलीच्या वारीमध्ये तुझी टाळमृदुंगाची अनुपस्थिती आम्हाला नक्कीच भासणार.

तुझ्याजवळ चर्चगेट ते बोरीवलीपर्यंतचा रेल्वे पास असायचा. गोरेगाव येथील सांस्कृतिक कार्यक्रम असो वा पारल्यात मॅजिस्टिक गप्पा असो वा संघमंदिरात नाट्यछटा असो तू अगदी आवर्जून जायचास. सह्याद्री वाहिनीच्या 'महाचर्चा' या टॉकशोमध्ये प्रेक्षकांमध्ये तू हटकून दिसायचास व कधीकधी तू स्वत: मार्मिक असे प्रश्न विचारायचास.

आमच्या परिवारांतून तू अचानक नाहीसा झालास ही वस्तुस्थिती पचविणे क्लेशदायक आहे. कालाय तस्मै नम:.

**- राजू बोरकर**, माहीम
मंबई मंच तर्फे

## निधन

| | | |
|---|---|---|
| दीपक अंबिकाचरण बोरकर | (सदाशिवगड) | माहीम |
| दुर्गानंद (कमलाकर) गोविंद बोरकर | (कोडीबाग) | अंधेरी |
| कुसुम देवीदास देसाई | (कडवाड) | चेंडिये |

| | | |
|---|---|---|
| लीला विश्वेश्वर देसाई | (हन्नळ्ळी) | पुणे |
| छाया परमानंद दिवेकर | (केरवडी) | गिरगांव |
| चंद्रकांत वेंकटराव दिवेकर | (कणसगिरी) | बोरीवली |
| सुनेत्रा (सरु) दिनानाथ गायतोंडे | (अंकोला) | पुणे |
| आनंद वासुदेव कसबेकर | (शिद्दर) | नेपीयन सी रोड |
| वामन महेश्वर कसबेकर | (कडवाड) | दादर |
| सुनंदा देवीदास (राया) कसबेकर | (खारगे) | वाळकेश्वर |
| जयवंत शांताराम कामत | (कडिये) | अंधेरी |
| लक्ष्मीबाई विनायक कुलकर्णी | (हळगे) | जोगेश्वरी |
| सुरेश मधुकर मुझुमदार | (अंकोला) | नायगांव |
| शिवराव देवराव मुझुमदार | (अंकोला) | माहीम |
| नागेश रामचंद्र मुझुमदार | (अंकोला) | बोरीवली |
| मनोहर गणपत नाडकर्णी | (सांवरपै) | पुणे |
| ★ विनायक बाबुराव नाडकर्णी | (मल्लापूर) | गोरेगांव |
| विठ्ठल रुद्रा पालेकर | (कडवाड) | कोपरखेरणे |
| दुर्गा मनोहर पालेकर | (बाड) | वसई |
| गंगाधर बाळकृष्ण पालेकर | (तोडूर) | बंगळूर |
| मनोरमा मनोहर राजाध्यक्ष (पूर्वाश्रमीच्या मनोरमा सदाशिव कसबेकर) | (कडवाड) | मुंबई |
| अपर्णा मंगेश रांगणेकर (पूर्वाश्रमीच्या शैला कृष्णराव पिंगे) | (कडवाड) | दादर |
| सरिता सुभाष सुंठणकर (पूर्वाश्रमीच्या मीना सदानंद बोरकर) | (कडवाड) | बेळगांव |
| जयवंत (विनू) श्रीपाद शेटगिरी | (अंकोला) | बोरीवली |
| सदानंद शिवराव तेलंग | (केरवडी) | ठाणे |
| विश्वेश्वर (अचा) कृष्णराव वाघ | (सदाशिवगड) | खार |
| गुरुदास गोविंद वाघ | (सदाशिवगड) | विरार |
| ज्ञानराज ब्रह्मेश वाघ | (सदाशिवगड) | चौपाटी |
| महेश्वर शांताराम वाघ | (सदाशिवगड) | आंबेवाडी |
| हीरा (सुशीला) जिवाजी वागळे | (बाड) | दादर |
| माधव (मन्या) महेश्वर वागळे | (माजाळी) | पुणे |
| मंगेश मनोहर वागळे | (माजाळी) | आंबेवाडी |
| घनश्याम पुरुषोत्तम वागळे | (अस्नोटी) | पारले |
| कृष्णाबाई गणपत वागळे | (उळगे) | पुणे |
| मंजनाथ गजानन वर्टी | (सदाशिवगड) | पुणे |

★ (डॉ. विनायक (बाबन) नाडकर्णी यांनी देहदान केलेले आहे)



# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या (मागील अंकानंतर)

## उल्लेखनीय देणग्या

### श्रीमती ताराबाई व श्री. शांताराम भेंडे (भेंडेमास्तर) यांच्या स्मरणार्थ पाच लाख एक रुपयांची देणगी

कारवार येथील हिन्दु हाय स्कूलमधील एक माजी ऋषीतुल्य शिक्षक व मुख्याध्यापक कै. शांताराम दत्तात्रय भेंडे उर्फ भेंडेमास्तर यांचे तीनही मुलगे दत्तात्रय (चंद्रकांत), उमेश व डॉ. किशोर हे अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. श्री. उमेश भेंडे यांनी तीन वर्षांपूर्वी संघाला दीड लाख रुपयांची देणगी दिली होती. गेल्या वर्षी भेंडेमास्तर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी श्री. दत्तात्रय भेंडे यांनी पांच लाख रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच डॉ. किशोर व सौ. सीमा भेंडे यांनी आईवडिल श्रीमती ताराबाई व भेंडेमास्तर यांच्या स्मरणार्थ संघाच्या अमृत महोत्सवी निधीसाठी पाच लाख एक रुपयांची देणगी दिलेली आहे.

### सौ. भावना व श्री नाडकर्णी यांजकडून आणखी चार लाख रुपयांची देणगी

गेल्या ऑगस्ट २०१२च्या मुखपत्रिकेच्या अंकांत गोव्यांत स्थायिक झालेल्या सौ. भावना (सुलेखा) व श्री. नंदकुमार वेंकटराव नाडकर्णी यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला दिलेल्या तीन लाख रुपयांच्या देणगीचा उल्लेख आला होता. अलीकडेच त्यांनी आणखी चार लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यांतील दोन लाख रुपये भावनाचे आईवडिल श्रीमती शैला व श्री. नरहरी (शिवानंद) मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ आहेत तर ऊर्वरित दोन लाख रुपये नंदकुमारचे आईवडिल श्रीमती सुशीला व श्री. वेंकटराव शंकर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी आहेत.

### श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव सबनीस यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाला दीड लाख रुपयांची देणगी

सुमारे शंभर वर्षांपूर्वी जोगेश्वरी येथे स्थापन झालेली 'सरस्वती बाग' ही कारवारकरांची मुंबईतील पहिली वसाहत. तब्बल पन्नास वर्षानंतर कारवारकरांच्या अनेक सोसायट्या निर्माण झाल्या. त्यांतील दादर येथील 'प्रगती' ही पहिली सोसायटी. कारवारकरांच्या पहिल्या वसाहतींत व पहिल्या सोसायटीत राहणारे एकमेव कुटुंब म्हणजे कै. वासुदेव सबनीस यांचे. जोगेश्वरी येथे असताना अरविंद गंडभीर हायस्कूल चालविणाऱ्या जोगेश्वरीच्या एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारी मंडळाचे ते सभासद होते. शाळेची नवी वास्तू बांधण्याच्या वेळी बांधकाम कमिटीचे सभासद म्हणून त्यांचे विशेष योगदान होते. श्री. सबनीस यांचे १९८३ साली निधन झाले तर त्यांच्या पत्नी श्रीमती स्नेहलता (चंपू) या १९९३ साली निवर्तल्या. उभयतांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कन्या श्रीमती उषा वसंत देसाई व श्रीमती सुरेखा जयंत नाडकर्णी यांनी संघाला ७५ हजार रुपयांची देणगी दिली आहे. तसेच नाती नयना वासन, डॉ. पौलिमी नाडकर्णी

सोनी व अनिला जयंत नाडकर्णी व पणती ऐश्वर्या वासन व आनिका सोनी यांनी मिळून आणखी ७५ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

### श्रीमती यमुना बोरकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

गिरगांव येथे राहणाऱ्या श्रीमती यमुना यशवंत बोरकर यांचे गेल्या वर्षी देहावसान झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या एका आप्तेष्टांकडून संघाला अलीकडेच वृद्धसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी मिळालेली आहे.

### संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती सुनंदा व गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी, श्री. रामकृष्ण शिवराव वाघ, श्रीमती स्नेहलता, श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग व श्रीमती शकुंतला व श्री. त्रिंबक महाबळेश्वर तेलंग यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ यांच्या मुलांकडून | ५,००० |
| २. | श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी शिवराव वाघ श्रीमती स्नेहलता गोपीनाथ वाघ व श्री. रामकृष्ण शिवराव वाघ यांच्या स्मरणार्थ सर्वश्री अविनाश व सुधीर रामकृष्ण वाघ यांजकडून | ५,००० |
| ३. | डॉ. गोविंद नारायण नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती प्रतिमा प्रमोद मुझुमदार यांजकडून | ११,००१ |
| ४. | श्री. जयवंत यशवंत नाडकर्णी यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | ५,००० |
| ५. | श्रीमती पार्वतीबाई व श्री. गणपत पांडुरंग नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सुमित्रा जयवंत नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ६. | श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या १२व्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. दिगंबर मारुति कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |
| ७. | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या १७व्या पुण्यतिथीनिमित्त नाती कुमारी सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ८. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ४ थ्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ९. | श्री. गोविंद नारायण नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १०,००० |



| | | |
|---|---|---|
| १०. | श्रीमती शांताबाई (वच्छी) गोविंद नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १०,००० |
| ११. | श्रीमती मीरा (सुशीला) चंद्रकांत नाडकर्णी यांच्या ५व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अतुल व स्नुषा श्रीमती अंजली यांजकडून | २,००१ |
| १२ | श्रीमती वृंदा गजानन कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचा श्री. दिलीप गणपत आरस यांजकडून | ३५,००० |
| १३. | श्रीमती शांता विनायक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पती डॉ. विनायक बाबुराव नाडकर्णी यांजकडून | १०,००० |
| १४. | श्रीमती कमल विश्वनाथ फेणे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. विश्वनाथ गोविंद फेणे यांजकडून | ३,००० |
| १५. | श्री. शिवानंद बाळकृष्ण पालेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. विठ्ठल (बाळ) यांजकडून | १०,००० |
| १६. | श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती उषा वसंत देसाई व श्रीमती सुरेखा जयंत नाडकर्णी यांजकडून | ७५,००० |
| | नाती श्रीमती नयना वासन, डॉ. पौलीमी नाडकर्णी-सोनी, अनिला जयंत नाडकर्णी व पणती ऐश्वर्या वासन व आनिका सोनी यांजकडून | ७५,००० |
| १७. | श्री. भवानीशंकर गोविंद कसबेकर यांच्या स्मरणार्थ पत्नीकडून | ५,००० |
| १८. | श्रीमती शांताबाई जयवंत कुलकर्णी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अरविंद यांजकडून | १,००१ |
| १९. | चि. राहुल राजेश पालेकर याच्या वाढदिवसाच्या प्रसंगी आजोबा श्री. शशिकांत विनायक नाडकर्णी यांजकडून | १,००१ |
| २०. | कुमारी निधी अतुल नाडकर्णी हिच्या वाढदिवसाच्या प्रसंगी आई श्रीमती स्मिता यांजकडून | १,००१ |
| २१. | श्री. आनंद गणपती वर्टी यांच्या ७६ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती अनुराधा यांजकडून | ५,००० |
| २२. | प्रा. व्ही.टी. यार्दी ट्रस्टकडून | १,८७५ |
| २३. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. माधव रामदास नायक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी कन्या कुमारी मानसी माधव नायक यांजकडून | १,५०० |
| २. | श्रीमती शैला व श्री. नरहरी (शिवानंद) मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या व जामात, श्रीमती भावना (सुलेखा) व श्री. नंदकुमार वेंकटराव नाडकर्णी यांजकडून | २,००,००० |

## वृद्धसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती कुसुम विश्वेश वागळे यांच्या स्मरणार्थ कन्या व जामात श्रीमती शुभलक्ष्मी व श्री. प्रकाश त्रिंबक कुलकर्णी यांजकडून दिवाळी २०१२ प्रसंगी | १०,००० |
| २. | श्री. मंगेश वसंत नाडकर्णी याच्या स्मरणार्थ आई-वडिल श्रीमती अलकनंदा व श्री. वसंत मनोहर नाडकर्णी यांजकडून | ३,००० |
| ३. | श्री. सुरेश दुर्गप्पा नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पत्नी श्रीमती सीमा यांजकडून | १०,००० |
| ४. | श्री. मधुसूदन शामराव कसबेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती निर्मला यांजकडून | ५,००० |
| ५. | श्रीमती यमुना यशवंत बोरकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ५०,००० |
| ६. | श्रीमती सुशीला व श्री. वेंकटराव शंकर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. नंदकुमार व स्नुषा श्रीमती भावना (सुलेखा) यांजकडून | २,००,००० |
| ७. | श्री. मारुति मंगेश कसबेकर यांच्या इच्छेनुसार | २०,००० |
| ८. | श्रीमती कुमुदिनी व श्री. कृपाकर गोविंद वागळे यांच्या स्मरणार्थ श्री. कृपाकर गोविंद वागळे यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी कन्या श्रीमती पूजा शरद गोठिवरेकर यांजकडून | १०,००० |
| ९. | श्री. वसंत शांताराम गायतोंडे यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. वासुदेव यांजकडून | ५,००० |
| १०. | श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १२व्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |



| | | |
|---|---|---|
| ११. | श्री. मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या ८०व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | २,००१ |
| १२. | श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अरुणकुमार यांजकडून | १०,००० |
| १३. | श्री. शरद गोपीनाथ वाघ यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी बहीण श्रीमती कमला गोपीनाथ वाघ यांजकडून | १५,००० |

## अमृतमहोत्सव निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती ताराबाई व श्री. शांताराम दत्तात्रय भेंडे यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. किशोर व स्नुषा श्रीमती सीमा यांजकडून | ५,००,००१ |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती राधाबाई व श्री. यशवंत त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती सुमित्रा जयवंत नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| २. | श्रीमती वीणा पुरुषोत्तम मोये यांजकडून त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी | ५,००० |
| ३. | श्रीमती वृंदा गजानन कसबेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भाचा श्री. दिलीप गणपत आरस यांच्याकडून | २५,००० |
| ४. | श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | १,००१ |
| ५. | श्री. मोहन मंगेश वाघ यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी मेहेरु व कन्या मनीषा मोहन वाघ यांजकडून | ५,००१ |
| ६. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ४ थ्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ७. | श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ८. | श्रीमती शांताबाई जयवंत कुलकर्णी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अरविंद यांजकडून | २,००१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | प्रा. व्ही.टी. यार्दी ट्रस्टकडून | | १,१२५ |
| १०. | श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या ७ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | | १०,००० |
| ११. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | | १,००० |

### मुंबई मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अरविंद जयवंत कुलकर्णी | ताडदेव | १,००१ |
| २. | श्री. रजनीकांत शिवानंद तेलंग | जोगेश्वरी | १०,००० |
| ३. | श्रीमती सुधा चंद्रकांत फडणीस | प्रभादेवी | १,१११ |
| ४. | श्रीमती लता काशिनाथ पालेकर | माहीम | ५,००० |
| ५. | श्रीमती स्वाती जयंत पावशे | पारले | ५,००० |
| ६. | हितचिंतक | | १,५७० |
| ७. | डॉ. सदानंद विनायक नाडकर्णी | माहीम | ७,००० |
| ८. | पिकळे हेल्थ केअर | माहीम | ५,००० |

### ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पराग रमेश महाले | पुणे | ५,००० |
| २. | श्रीमती सीमा सुरेश नाडकर्णी | ठाणे | २,००० |
| ३. | श्रीमती रेखा शरद सलगर | ठाणे | १०,००० |
| ४. | हितचिंतक | | १०,००१ |
| ५. | श्री. नागेश श्रीपाद बोरकर | पुणे | १,००१ |
| ६. | श्रीमती ऊर्मिला राजेन्द्र नाबर | अंधेरी | १,१११ |
| ७. | श्री. अरविंद जयवंत कुलकर्णी | ताडदेव | १,००१ |
| ८. | श्रीमती सुधा चंद्रकांत फडणीस | प्रभादेवी | १,१११ |
| ९. | श्रीमती विद्या नीलेश कामत | पारले | १,००१ |



Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.